# प्रकरण - सहा

## निष्कर्ष आणि शिफारशी

# प्रकरण ६ वे

## निष्कर्ष आणि शिफारशी

६·१ प्रस्तावना·

६·२ शैक्षणिक अर्हता व अनुभव·

६·३ मूल्ये आणि त्यांचे संक्रमण·

६·४ मूल्य शिक्षणाबाबतची कृतिसत्रे / शिबिरे·

६·५ मूल्यांचे मूल्यमापन·

६·६ सर्वसाधारण निष्कर्ष आणि शिफारशी·

६·७ पुढील संशोधनासाठी कांही विषय·

=0=0=0=0=0=

# प्रकरण - ६ वे

## निष्कर्ष आणि शिफारशी

### ६·१ प्रस्तावना :

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय " प्राथमिक स्तरावरील मराठीच्या पाठयपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास " हा असून या विषयाच्या संदर्भात पाठयपुस्तकांचे अध्यापन करत असतांना पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याचे दृष्टिने कोणते प्रयत्न करतात ? मूल्ये रुजवण्याचे दृष्टीने कांही उपक्रम योजतात कां ? मूल्यांच्या संदर्भात शिक्षकांचे शिबिर अथवा कृतिसत्र झाले आहे का ? संक्रमित मूल्यांचे मूल्यमापन करता येईल कां ? हे जाणून घेण्याचे उद्देशाने इयत्ता १ ते ४ वर्गांचे अध्यापन करणा-या शिक्षकांसाठी प्रश्नावली तयार केली होती· ( या प्रश्नावलीचे विश्लेषण प्रकरण क्रमांक १ पृष्ठांक १६ वर केलेले आहे·) मागील प्रकरण पांचमध्ये या प्रश्नावलीद्वारा प्राप्त झालेल्या सामग्रीचे विश्लेषण करुन अन्वयार्थ लावलेला आहे· प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यावर आधारित निष्कर्ष आणि शिफारशी सादर केलेल्या आहेत· तसेच पुढील संशोधनासाठी कांही विषय सुचविले आहेत·

### ६·२ अध्यापकांची शैक्षणिक अर्हता व अनुभव :

सारणी क्रमांक ५·१ ( प्रश्नावलीला प्रतिसाद देणा-या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता ) वरुन असा निष्कर्ष निघतो की, प्राथमिक स्तरावर शिक्षकांसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता १०६ पैकी १०० अध्यापकांनी (९५%) मिळवलेली आहे· १०६ पैकी ६ शिक्षक ( ५% ) केवळ पी·एस·सी· अथवा अप्रशिक्षित आहेत·

सारणी क्रमांक ५·२ ( शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव ) वरुन खालील निष्कर्ष निघतात· अध्यापकांचा एकूण सरासरी अनुभव १७·६७ वर्षे इतका आहे·

कोणताही मानदंड लावला तरी वरील तथ्यातून नोंद झालेला अध्यापकांचा अनुभव हा दीर्घ आहे·

६·३ मूल्ये आणि त्यांचे संक्रमण :

सारणी क्रमांक ५·३ वरुन ( मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करण्यासंबंधी अध्यापकांचे मत ) खालील निष्कर्ष निघतात·

१०६ अध्यापकांपैकी ७४ अध्यापकांनी ( ६८·८१% ) मराठीचे अध्यापन करतांना पाठयपुस्तकातील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण केले जाते असे नमूद केले आहे·

१०६ पैकी ३२ अध्यापकांनी (३०·१९%) मराठी विषयाचे अध्यापन करतांना पाठयपुस्तकांतील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण केले जात नाही असे नमूद केले आहे·

बहुसंख्य शिक्षकांच्या (६९·८१%) मतानुसार पाठयपुस्तकांतील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण केले जाते हे स्पष्ट होते·

सारणी क्रमांक ५·४ मध्ये ( पृष्ठांक ८६ ) मूल्य संक्रमणाचे मार्गाचा विचार करतांना प्रामुख्याने खालील मार्ग स्पष्ट होतात· ते त्यांना मिळालेल्या प्रतिसादांच्या संख्येसह उतरत्या क्रमाने दिलेले आहेत·

| | | प्रतिसाद संख्या |
|---|---|---|
| १. | मूल्यांवर आधारित पौराणिक, ऐतिहासिक, व्यवहारातील कथा, उदाहरणे, दाखले, संत, आदर्श पुरुष इत्यादींच्या जीवनातील प्रसंगाद्वारे मूल्य संक्रमण करणे. | २४ |
| २. | पाठाचे अध्यापन करतांना मूल्ये संक्रमित व्हावीत या उद्देशाने जाणीवपूर्वक प्रभावी अध्यापन करणे. | १७ |
| ३. | राष्ट्रीय सण, थोर पुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या, विविध त-हेचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांची योजना करुन त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे. | १६ |
| ४. | आदर्श व गौरवास्पद वर्तन केलेल्या व्यक्तींचा, विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार समारंभ करणे, समाजातील अशा घटना, प्रसंग विद्यार्थ्यांना सांगणे. | ९ |
| ५. | शिक्षकांचे वर्तन त्यांचे आचरण या द्वारे मूल्ये संक्रमित करणे. | ३ |
| ६. | पाठाचा सारांश कथारुपाने सांगून मूल्यांचे जीवनातील महत्व व गरज कथन करणे. | ३ |
| ७. | पाठातील चित्रावरुनचर्चा करुन हक्-श्राव्य साधनांच्याद्वारे मूल्ये ठसविणे. | २ |

याबाबत खालील प्रमाणे शिफारस केलेली आहे.

मूल्ये संक्रमित करण्याचे विविध मार्ग आहेत. यापैकी जे अध्यापक वर नमूद केलेल्या ज्या मार्गांचा अवलंब करत नसतील त्यांनी त्या मार्गांचा अवलंब देश, काल, परिस्थितीनुसार करावा.

सारणी क्रमांक ५.७ मध्ये ( पृष्ठांक ) मूल्य संक्रमणाच्या प्रमाणावरुन खालील निष्कर्ष निघतात.

मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होतात असे १००% शिक्षकांचे मत आहे.

मूल्ये मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात असे १०६ पैकी ३० ( २८.३०%) प्रतिसादकांचे मत आहे.

मूल्ये अल्प व अत्यल्प प्रमाणात संक्रमित होतात असे १०६ पैकी ७६ ( ७१.६९ % ) प्रतिसादकांचे मत आहे.

बहुसंख्य प्रतिसादकांच्या मतानुसार ( ७१.६९% ) मूल्ये अल्प प्रमाणात संक्रमित होतात. याचाच अर्थ मूल्ये मोठ्या अथवा फारमोठ्या प्रमाणात संक्रमित होत नाहीत.

सारणी क्रमांक ५.५ ( पृष्ठांक ) , सारणी क्रमांक ५.६ (पृष्ठांक ) व सारणी क्रमांक ५.८ ( पृष्ठांक ) या सारण्यावरुन मूल्ये संक्रमित न होण्याची पुढील प्रमाणे कारणे स्पष्ट होतात.

| | | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | परीक्षा पध्दतीत मूल्यांवर प्रश्न नाही. | ४३.७५% |
| २. | मूल्ये शिकवण्यावर भर दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही. | ३७.५ % |

| | | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ३. | मूल्य संक्रमित करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नव्हे. | ६.२५% |
| ४. | दैनंदिन व्यवहारात मूल्यांचा उपयोग होत नाही. | १४.००% |
| ५. | मूल्य अध्यापनाच्या संदर्भात प्रशिक्षण, मार्गदर्शन यांचा अभाव, निश्चित अध्यापन पद्धती नाही, मूल्य - शिक्षणाच्या संदर्भात कृतिसत्र अथवा शिबिर प्राथमिक स्तरावर घेतले जात नाही. त्यामुळे मूल्य संक्रमणाकडे दुर्लक्ष. | ३७.५० % |
| ६. | समाजामध्ये मूल्यांच्याबाबत असलेली उदासिनवृत्ती व मूल्यांचा -हास होतांना दिसतो त्यामुळे मूल्यां- वरील विश्वास उडतो. | १८.७५ % |
| ७. | एकाच शिक्षकास सर्व विषयाचे अध्यापन करावे लागते त्यामुळे मूल्यशिक्षणाकडे दुर्लक्ष होते. | १२.५ % |
| ८. | विद्यार्थी संख्या भरमसाठी त्यामुळे मूल्यसंक्रमणाकडे दुर्लक्ष होते. | १२.५ % |
| ९. | चित्रपट, दूरदर्शन, जाहिरातबाजी यांचा बालमनावर अनिष्ठ परिणाम होतो. | ६.२५ % |
| १०. | शिक्षणाद्वारे संक्रमित केलेली मूल्ये कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीत टिकतील असे वातावरण नाही. मूल्ये ढासळलेली सामाजिक परिस्थिती यांच्या प्रभावामुळे मूल्यसंक्रमण नाही. | ३६.९२ % |
| ११. | पालक, विद्यार्थी यांचा परीक्षार्थीदृष्टिकोन, घोकंपट्टीकरुन केवळ पुस्तकीज्ञान वाढवण्याकडे लक्ष त्यामुळे मूल्य संक्रमणाकडे दुर्लक्ष. | २४.६२ % |

| | | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १२. | अपुरी शिक्षक संख्या, वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांत आपुलकीची भावना जिव्हाळा नाही. | १५.३८ % |
| १३. | पाठ शिकवल्यावर मूल्यांच्या दृष्टिकोनातून त्याचा पडताळा घेतला जात नाही. | ९.२३ % |
| १४. | पालकांकडून , समाजाकडून मूल्यसंक्रमणाबाबत पुरेसे सहकार्य मिळत नाही. | ७.६९ % |
| १५. | मूल्य संक्रमणाच्या दृष्टीने शालेय वातावरण प्रभावी नाही. तसेच शैक्षणिक साधनांचा अभाव. | ४.६२ % |
| १६. | विद्यार्थ्यांचे लहान वय त्यामुळे त्यांचे खेळाकडे लक्ष अधिक असते. त्यामुळे मूल्य संक्रमण नाही. | १.५४ % |

शिक्षकांनी मूल्ये संक्रमित न होण्याच्या संदर्भात जी कारणे नमूद केलेली आहेत त्या संदर्भात पुढील शिफारशी कराव्याशा वाटतात.

प्राथमिक स्तरावरील शिक्षकांना प्रशिक्षण काळात अथवा सेवान्तर्गत प्रशिक्षण देऊन त्यांचा मूल्यांबाबत योग्य दृष्टिकोन तयार करावा. यासाठी दीर्घ मुदतीच्या सुट्टीच्या कालावधीत असे प्रशिक्षण दिले जावे. याबाबत शासन, प्राथमिक शिक्षण मंडळे, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी पुढाकार घ्यावा अथवा असे वर्ग प्रशिक्षण विद्यालयाकडे किंवा प्रशिक्षण महाविद्यालयांच्या विस्तार सेवा केंद्राकडे सोपवले जावेत व या बाबतीत विशेष तज्ञांकडून मार्गदर्शन केले जावे.

प्राथमिक स्तरावरील एका वर्गातील विद्यार्थी संख्या मर्यादित हवी.

सुमारे ४० विद्यार्थी संख्या असावी·

मूल्य रुजवण्यामध्ये दृक्-श्राव्य साधनांचा फार मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते· तरी दूरदर्शन, चित्रपट या सारख्या दृक्-श्राव्य माध्यमाद्वारे मूल्य रुजवण्यासाठी प्रयत्न केले जावेत·

मूल्यांचे मापन केवळ लेखी परीक्षाद्वारे सम्यक रीतीने होत नाही म्हणून केवळ लेखी परीक्षा असूनयेत· लेखी परीक्षे बरोबर निरीक्षण, मुलाखती इत्यादी साधनांच्या संबंधीची नोंद विद्यार्थ्यांच्या प्रगतीपुस्तकात करावी· तसेच समाजमिती तंत्र यांच्या द्वारे मूल्यमापन केले जावे·

विद्यार्थी वर्गात वर्षभर असतो· त्यामुळे त्याच्या संपूर्ण वर्षभराच्या कामास गुण द्यावेत·

शाळांमधून शिक्षक-पालक मेळावे भरवले जातात· त्यामधून मूल्यांचे जीवनातील महत्व याबाबत पालकांचे उद्बोधन करावे· यातून पालकांच्या ठिकाणी मूल्यांबाबत जागृती निर्माण करावी· तसेच या उद्बोधनातून घरचे वातावरण मूल्यपोषक कसे राहील याबाबत मार्गदर्शन केले जावे· आपल्या पाल्यामध्ये योग्य अशा मूल्यांचा संक्रमणासाठी असलेल्या पालकांच्या जबाबदारी बाबत मार्गदर्शन केले जावे·

सारणी क्रमांक ५·९ ( पृष्ठांक १०५ ) अनुसार प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यात मूल्ये चांगल्या त-हेने संक्रमित करण्यासाठी शिक्षक पुढील मार्गांचा अवलंब करतात असे आढळून आले·

| | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
| --- | --- |
| शाळेमध्ये अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रमांचे आयोजन करणे व त्यात मुलांचा सहभाग वाढविणे· | ३७·७४% |

| | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|
| पौराणिक, ऐतिहासिक कथा, उदाहरणे, दाखले, प्रसंग इत्यादी द्वारा. | २८·३०% |
| अंध-श्रध्दा, त्यातील खरेखोटेपणा प्रत्यक्ष दाखविणे, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे व तर्कशुध्द विचारशक्ती विकसित करणे. | १६·९८% |
| मुलांशी जवळीक साधून त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे त्यांची जिज्ञासूवृत्ती, निरीक्षणशक्ती विकसित करणे व मूल्यांचे जीवनातील महत्व समजावून देणे. | १५·०९% |
| पालक व समाज यांचे सहकार्य घेवून शालेय वातावरण व परिसर मूल्यपोषक ठेवणे. | ११·३२% |
| मूल्यांवर आधारित पाठांची रचना करुन मूल्यकेंद्रित अध्यापन करणे या करिता अभ्यासक्रम पुर्नरचना करावी. | ९·४३% |
| स्वत:चा आदर्श शिक्षकांनी विद्यार्थ्यासमोर ठेवावा. | ७·५४% |

---

या संदर्भात पुढील शिफारशी कराव्याशा वाटतात.

अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांची योजना करतांना कोणती मूल्ये त्यामधून रुजवावयाची हे निश्चित करावे व कार्यक्रमानंतर त्याच्या यशस्वितेचे मूल्यमापन व्हावे. तसेच वर्षाच्या शेवटी संपूर्ण वर्षभराच्या उपक्रमांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून मूल्यमापन करावे व त्याच्या पार्श्वभूमीवर पुढील वर्षाचे उपक्रमात

मूल्यांच्या कार्यवाही संदर्भात सुधारणा घडवून आणावी हे मूल्यमापन वस्तुनिष्ठ व्हावे या दृष्टिने ते कोणा एका व्यक्तीने न करता ३ ते ५ जणांची मूल्यमापन समिती नियुक्त करण्यात यावी.

अशा उपक्रमांमध्ये नेहमी ठराविक विद्यार्थीच सहभाग घेतात. तर, कांही विद्यार्थी अजिबात सहभाग घेत नाहीत. अशा विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात यावे.

सारणी क्रमांक ५.१० ( पृष्ठांक १११ ) मध्ये मूल्ये संक्रमित करण्याच्या उद्देशाने योजत असलेल्या कार्यक्रमांवरून असा निष्कर्ष निघतो की, सर्व प्राथमिक शाळांमध्ये मूल्ये संक्रमित करण्याच्या उद्देशाने अभ्यासपूरक कार्यक्रम योजले जातात.

सारणी क्रमांक ५.११ ( पृष्ठांक ११२ ) व सारणी क्रमांक ५.१२ ( पृष्ठांक ११४ ) यावरून असा निष्कर्ष निघतो की, बहुसंख्या शिक्षक (७६.६९%) मूल्य संक्रमित होण्याच्यादृष्टीने अभ्यासपूरक कार्यक्रम आयोजित करतात. ( पहा सारणी क्रमांक ५.११ पृष्ठांक ११२ )

याबाबत असे सुचवावेसे वाटते की, प्राथमिक शिक्षकांनी सुचविलेले सर्वच उपक्रम स्तुत्य आहेत. ज्या शाळांमधून या उपक्रमांपैकी जे उपक्रम राबवले जात नसतील ते देश, काळ, परिस्थितीनुसार राबवले जावेत.

## ६.४ मूल्यशिक्षणाबाबतची कृतिसत्रे / शिबिरे :

सारणी क्रमांक ५.१३ ( पृष्ठांक ११८ ) आणि ५.१४ (पृष्ठांक ११९ ) आणि त्या सारणीखाली केलेले विवेचन यावरून असा निष्कर्ष निघतो की, एकही प्राथमिक शिक्षक मूल्यशिक्षणाच्या कृतिसत्रास अथवा शिबिरास उपस्थित राहिलेला नाही.

यावरून अशी शिफारस करावीशी वाटते की, महाराष्ट्र राज्य प्राथमिक

शिक्षक संघ, महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद, प्राथमिक शिक्षण मंडळे, राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, अशा सारख्या संस्थांनी मूल्यशिक्षण विषयक शिबिरे आयोजित करावीत. त्यामध्ये हजर राहण्यास प्राथमिक शिक्षकांना उत्तेजन द्यावे. उत्तेजन देऊन ही ते जात नसतील तर त्यांना ते अनिवार्य करण्यात यावे. प्राथमिक शिक्षकांनी या शिबिरात झालेल्या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन मूल्याधिष्ठित अध्यापन करावे.

६.५ मूल्यांचे मूल्यमापन :

सारणी क्रमांक ५.१५ ( पृष्ठांक १२० ) यावरुन मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाही याच्या मूल्यमापनाबाबत खालील निष्कर्ष आढळून येतात.

मूल्य संक्रमणाचे मूल्यमापन करता येते असे १००% प्रतिसादकांचे मत आहे.

सारणी क्रमांक ५.१६ ( पृष्ठांक १२१ ) अनुसार मूल्ये किती प्रमाणात रुजली आहेत याचे मूल्यमापन करता येते असे १००% प्रतिसादकांचे मत आहे.

सारणी क्रमांक ५.१७ ( पृष्ठांक १२३ ) मध्ये मूल्यांचे " मूल्यमापन करण्याचे पुढील प्रमाणे विविध मार्ग प्रतिपादन केलेले आहेत.

| अ.नं. | मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे विविध मार्ग | प्रतिसाद संख्या शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | लेखी व मौखिक स्वरुपाची परीक्षा घेऊन म्हणजेच विद्यार्थ्यांना विविध समस्यांवरील व मूल्यांवरील प्रश्न विचारुन त्यांच्या येणाऱ्या उत्तराच्या स्वरुपावरुन मूल्यमापन करता येते. | ५८.४९% |
| २. | विद्यार्थ्यांचे विविध प्रसंगातील वर्तनाचे निरीक्षण करुन मूल्यांचे मूल्यमापन करता येते. | ४९.०५% |

| अ.नं. | मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे विविध मार्ग | प्रतिसाद संख्या शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ३. | विद्यार्थ्यांचे व्यवहारातील वर्तन म्हणजेच आपले सहकारी, समाज, विविध व्यक्ती यांच्याशी तो कसा वागतो यावरून मूल्यमापन करता येईल. | १८.८७% |
| ४. | वेगवेगळे कार्यक्रमशाळेत आयोजित करून त्यांची जबाबदारी विद्यार्थ्यांवर टाकून ती पारपाडण्याची त्यांची कार्यपध्दती व कुवत यांच्या वरून. | १८.८७% |
| ५. | विद्यार्थ्यांचा अध्ययनातील सहभाग आजमावून म्हणजेच कोणतीही गोष्ट आत्मसात करण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्ती यावरून मूल्यमापन करता येते. | ११.३२% |
| ६. | मुलांना त्यांनी रोज केलेल्या कामाची नोंद (दैनंदिनी) करावयास लावणे व त्यावरून मूल्यांचे मूल्यमापन करणे. | ९.४३% |
| ७. | पाठयपुस्तकातील घटकांवर, पाठांवर, कृतिपुस्तिका तयार करून ती मुलांच्याकडून सोडवून घ्यावी व त्या द्वारे मूल्यांचे मूल्यमापन करावे. | ७.५५% |

## ६.६ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी :

(१) मूल्य शिक्षणासाठी दृक्-श्राव्य साधनांचा उपयोग केला जावा. विद्यार्थ्यांना मूल्यांवर आधारित असलेले चित्रपट दाखवावेत. उदाहरणार्थ शामची

आई, संत ज्ञानेश्वर, राजा हरिश्चंद्र, महात्मा फुले इत्यादी.

(२) सध्याच्या परीक्षापत्रकात मूल्ये किती प्रमाणात रुजली याचा उल्लेख नसतो. तरी परीक्षापत्रकात याचा स्वतंत्रपणे उल्लेख करण्यात यावा. हा उल्लेख अंकात करता येण्यासारखा नसल्याने श्रेणीबध्द स्वरुपात किंवा विधानात्मक स्वरुपात असावा.

(३) मूल्यसंवर्धन ही केवळ शाळेची जबाबदारी नाही. तरी मुलांचे चांगले अथवा वाईट कोणत्याही प्रकारचे वर्तन वेळोवेळी त्याच्या पालकांना कळविण्यात यावे. चांगल्या वर्तनाबद्दल विद्यार्थ्याला शाबासकी देण्यात कंजुषी करु नये, त्यासाठी पालकांचीही प्रशंसा करावी आणि वाईट वर्तनाबद्दल मुलाला समज देऊन त्याची कानउघडणी करण्यात यावी. मात्र अशी समज चार चौघांत न देता त्याला एकट्याला विश्वासात घेऊन तो करीत असलेल्या वर्तनाचे अनिष्ट परिणाम कोणते ते दाखवून त्याच्या सद्विचारांना व सद्भावनांना आवाहन करुन द्यावी. या संबंधीची माहिती पालकांनाही देऊन त्यांना पाल्याच्या वर्तनात इष्ट परिवर्तन व्हावे म्हणून कशा प्रकारची उपाययोजना करावी या बाबत मार्गदर्शन करावे.

(४) समाजघडण, समाजस्वास्थ व समाजाच्या उत्कर्षासाठी मूल्य-संक्रमण आवश्यक असल्याने विद्यार्थ्यांत मूल्यसंक्रमण होण्यासाठी मुलांच्या शिक्षणाशी संबंधित असलेल्या घटकांमध्ये म्हणजेच शासन ( शासकीय शिक्षणाधिकारी ) संस्था-चालक, शाळाचालक, शिक्षक, पालक आणि समाजातील इतर लोक यांच्यामध्ये सामंजस्य आणि सहकार्य असणे आवश्यक आहे. या बाबतीत शिक्षणाधिकारी आणि शाळाचालक यांनी पुढाकार घेऊन अशा प्रकारचे सहकार्य आणि सामंजस्य निर्माण करुन ते वृध्दिंगत कसे होईल या विषयी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

## ६.७ पुढील संशोधनासाठी कांही विषय :

प्रस्तुत प्रकरणाच्या आतापर्यंतच्या भागात या संशोधनाचे निष्कर्ष आणि

शिफारशी सादर केल्या. हे संशोधन करत असतांना संशोधकाला कांही समस्या जाणवल्या. त्या समस्या प्रस्तुत संशोधनविषयाशी प्रत्यक्ष संबंधित नसल्यामुळे संशोधकाने त्या समस्यांच्या मूळापर्यंत जाऊन त्यांचा सखोल, सांगोपांग व तपशीलवार परामर्ष घेतलेला नाही. तथापि या समस्यांचा अशाप्रकारे अभ्यास केला गेल्यास तो प्रस्तुत संशोधनसमस्येच्या सर्वांगिण , सम्यक्, आकलनास उपकारकच होईल,असे वाटते. या समस्यांचा खालील परिच्छेदातून पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

(१) मूल्ये प्रभावीपणे रूजवण्यासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांची अत्यंत आवश्यकता असते. यासाठी प्राथमिक स्तरावर राबवावयाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम व त्याद्वारे रूजवावयाची मूल्ये याबाबत अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

(२) मूल्यशिक्षण प्रभावी होण्यासाठी शाळेतील विद्यार्थी संख्या, शैक्षणिक साधणे व परिसर यांचा प्रभाव व परिणामकारकता याबाबत अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

(३) मूल्यशिक्षणात मूल्यांचे संक्रमण किती प्रमाणात झाले आहे. याचे मूल्यमापन करणे ही एक फारमोठी समस्या आहे. हे मूल्यमापन प्रभावी होण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे व अचुक मूल्यमापन कसे करावे याबाबतही अधिक संशोधन व्हावे. तसेच ते यथार्थ, विश्वसनीय आणि वस्तुनिष्ठ कसे होईल यासंबंधी देखील संशोधन करण्यात यावे.

(४) विद्यार्थ्यांची शालेय प्रगती आणि त्याचा मूल्यांविषयीचा दृष्टिकोन किंबहुना त्याची मूल्य संपादणूक या मध्ये सहसंबंध आहे का ? आणि तो असल्यास त्या सहसंबंधाचे स्वरूप काय ? याबाबत अधिक संशोधन होणे अगत्याचे आहे.

(५) प्राथमिक स्तरावर काम करणारा शिक्षक हा मूल्ये जोपासणारा असणे आवश्यक आहे. त्यामुळे या स्तरावर शिक्षक निवडतांना त्याचा मूल्य-विषयक दृष्टिकोन, त्याची मूल्यविषयक निष्ठा व मूल्ये संक्रमित करावयाची त्याची क्षमता याची चाचणी होणे आवश्यक आहे. परंतु आजच्या परिस्थितीत अशा चाचण्या उपलब्ध नाहीत. त्यामुळे संशोधनाद्वारे अशा चाचण्या तयार केल्यास त्या उपयुक्त ठरतील. अशा प्रकारच्या चाचण्या तयार करता येतील कां ? तयार करता आल्यास त्यांची यथार्थता, विश्वासनीयता आणि वस्तुनिष्ठता सिध्द करता येतील कां ? आजच्या परिस्थितीत त्यांचा योग्य प्रकारे वापर करता येईल कां ? याविषयीदेखील संशोधन होणे अगत्याचे आहे.

=0=0=0=0=0=